॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आज़ादी का अमृत महोत्सव

**Phone : (02462) 215525** **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** **Website: srtmun.ac.in**

**Fax : (02462) 215572** **E-mail: dir.dsd@srtmun.ac.in**


जा.क्र./वि.वि.वि/२०२४–२५/02 दिनांक: ०२/०७/२०२४

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

विषय : **विशेष व्याख्यानमालांच्या आयोजनाबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी खालीलप्रमाणे विशेष व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात येते १) पूज्य स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला २) महात्मा गांधी व्याख्यानमाला ३) महात्मा ज्योतिबा फुले व्याख्यानमाला ४) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला ५) प्राचार्य हेमचंद्र धर्माधीकारी व्याख्यानमाला ६) कै. के. एम. देशमुख व्याख्यानमाला ७) कै. नरहर कुरूंदकर व्याख्यानमाला ८) कै. उत्तमरावजी राठोड व्याख्यानमाला. शैक्षणिक वर्ष २०२४ – २५ साठी उपरोक्त व्याख्यानमाला घेण्याबाबत चा प्रस्ताव **दि. ३१ जुलै, २०२४** पर्यंत संचालक, विद्यार्थी विकास विभागाकडे पाठविण्यात यावा. सदरील व्याख्यानमालेसाठी राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावरील प्रसिध्द साहित्यिक, समाजसुधारक व विधीतज्ज्ञ इत्यादी व्यक्तींना पाचारण करून व्याख्यानमाला आयोजित करावी. उपरोक्त व्याख्यानमालेकरिता संबंधितांनी विद्यापीठाकडे ठेव रक्कम ठेवली असून, ज्या महाविद्यालयास व्याख्यानमाला मंजूर केली जाईल अशा महाविद्यालयांनी प्रायोजकास सन्मानाने व्याख्यानमालेचे निमंत्रण द्यावे. अन्यथा संबंधित महाविद्यालयास विद्यापीठाकडून देण्यात येणारे अनुदान दिले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. व्याख्यानमालेसाठी विद्यापीठाच्या वतीने रू. ५०००/– (अक्षरी पाच हजार) अनुदान मंजूर करण्यात येते.

उपरोक्त तारखेनंतर आलेल्या प्रस्तवांचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती

डॉ. सूर्यप्रकाश जाधव
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग.

सीस्टीम एक्सपर्ट, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circular Regarding Lecture Series 2024-25 या शिर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home page मधील Administration सदराअंतर्गत प्रसिध्दिस देण्यात यावे.